ठाणे महानगरपालिका,ठाणे

संचालित

**चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्था**

महाराष्ट्र भूषण नानासाहेब धर्माधिकारी ग्रंथालय इमारत, तळ मजला, वेदांत शॉपींग कॉम्प्लेक्स समोर, कोरस रोड, वर्तकनगर, ठाणे (प.) ४०० ६०६. दुरध्वनी ०२२-२५८८१४२१

---

## स्पर्धा परीक्षा पूर्व तयारी मार्गदर्शन वर्ग २०२२-२३

## प्रवेश परीक्षा- २०२२

ठाणे महानगरपालिका संचालित चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्था ही केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC) मार्फत घेतल्या जाणाऱ्या परीक्षांना बसणाऱ्या विद्यार्थ्यांना नि:शुल्क मार्गदर्शन करणारी अग्रगण्य संस्था आहे. तसेच, अशा पध्दतीने प्रशासकीय प्रशिक्षण संस्था चालविणारी देशात ठाणे महानगरपालिका ही एकमेव महानगरपालिका आहे.

केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC) मार्फत घेतल्या जाणाऱ्या नागरी सेवा पूर्व परीक्षेकरीता विद्यार्थी/ प्रशिक्षणार्थी यांना पूर्णवेळ प्रशिक्षण मिळणेकरीता ठाणे महानगरपालिका, ठाणे संचालित चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेच्या स्पर्धा परीक्षा पूर्व तयारी मार्गदर्शन वर्गात प्रवेश देणेकरीता रविवार, दिनांक- ०७ ऑगस्ट २०२२ रोजी संस्थेमार्फत एक प्रवेश परीक्षा (चाचणी परीक्षा) घेतली जाणार आहे. प्रस्तुत जाहिरातीत नमुद केलेल्या अटी व शर्तीची पुर्तता करणाऱ्या उमेदवारांकडुन ऑफलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

संस्थेत प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांची/ प्रशिक्षणार्थींची निवड ही प्रवेश परीक्षा (चाचणी परीक्षा) व मुलाखतीव्दारे गुणवत्तेच्या आधारे प्रचलित पध्दतीने करण्यात येते. संस्थेमार्फत घेण्यांत येणाऱ्या प्रवेश परीक्षेच्या अटी व शर्ती, पात्रता, प्रवेश प्रक्रिया इत्यादी बाबींबाबतची माहिती खालील प्रमाणे आहे.

१. **प्रवेश क्षमता -** ७० प्रशिक्षणार्थी

२. **प्रवेश परीक्षा पध्दती :**

लेखी परीक्षा १०० गुण व मुलाखत ५० गुण अश्याप्रकारे संस्थेची प्रवेश परीक्षा एकूण १५० गुणांची राहील. सदर प्रवेश परीक्षेकरीता नकारात्मक गुण पध्दती लागू होणार नाही.

| विषय | प्रश्नांची संख्या | एकूण गुण | माध्यम | परीक्षेचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| सामान्य अध्ययन भाग - १ (SECTION- I)<br>• **Current Affairs & General Knowledge Books**<br>• **NCERT Books For 8th 9th & 10th Standard.**<br>• **General Mathematics upto 10th Standard.**<br>• **English Grammar and Paragraph based Questions.**<br>• **Logical Reasoning.** | १०० | १०० | ENGLISH | एकूण वेळ : १.३० तास सकाळी ११.०० ते दुपारी १२.३० वाजेपर्यंत |
| **मुलाखत** | | ५० | English, Hindi & Marathi | |

- भाग- १ ( SECTION - I ) या विषयाचा पेपर सकाळी ११.०० ते दुपारी १२.३० पर्यंत घेण्यात येईल.
- केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (UPSC) नागरी सेवा परीक्षाप्रमाणे गुणवत्ता यादी सामान्य अध्ययन भाग - १ (SECTION- I) या भागावरील गुणांवर व मुलाखत मध्ये प्राप्त गुणांवर आधारित राहिल.

**३. प्रवेश परीक्षेचा दिनांक** : रविवार, दि.- ०७ ऑगस्ट २०२२

**४. परीक्षेचा कालावधी** : सकाळी ११.०० ते दुपारी १२.३० ( एकूण - ९० मिनिटे/ दिड तास )

**५. प्रवेश परीक्षा अर्हता/ पात्रता :-**

अ) उच्च माध्यमिक परीक्षेत विज्ञान, वाणिज्य, कला शाखेत व पदविका परीक्षेत (Diploma Course) ७० हुन अधिक टक्के गुण मिळालेले विद्यार्थी अर्ज करण्यास पात्र आहेत.

ब) उमेदवार महाराष्ट्राचा अधिवास/रहिवासी असला पाहिजे (Domicile of Maharastra)

क) संस्थेच्या संपूर्ण प्रशिक्षण काळात उमेदवारास नोकरी करता येणार नाही.

**६. अर्ज करण्याची पध्दत -**

१) अर्जाचा नमुना संस्थेच्या व ठाणे महानगरपालिकेच्या संकेतस्थळावरुन उपलब्ध करुन घेता येईल. तसेच संस्थेमध्ये सुध्दा उपलब्ध असेल.

२) प्रवेश परीक्षा अर्ज हे संस्थेकडील विहित नमुन्यात ऑफ लाईन पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्याने, टपालव्दारे, कुरिअरव्दारे, तसेच ई-मेल व्दारे अर्ज स्विकारले जाणार नाहीत, याची नोंद घेण्यात यावी.

३) अर्जासोबत आवश्यक असणारे सर्व कागदपत्रे/ प्रमाणपत्रे (उदा. शाळा सोडल्याचा दाखला, गुणपत्रिका प्रत व दोन पासपोर्ट साईज फोटो) जोडणे आवश्यक आहे. तसेच अर्ज सादर करतेवेळी मुळ प्रमाणपत्र तपासणी साठी सोबत ठेवावे.

**७. प्रवेश परीक्षा संबंधीत महत्वाची माहिती- वेळापत्रक**

| | |
|---|---|
| अ) प्रवेश अर्ज सादर करण्याचा कालावधी | : दिनांक -०४/०७/२०२२ ते २९/०७/२०२२ |
| ब)प्रवेश परीक्षा दिनांक | : दिनांक -०७/०८/२०२२ |
| क) मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द | : दिनांक -१२/०८/२०२२ |
| ड) मुलाखतीचा दिनांक | : दिनांक-१८/०८/२०२२ ते १९/०८/२०२२ |
| इ) अंतिम निवड झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द | : दिनांक - २६/०८/२०२२ |

८. अंतिम निवड झालेल्या प्रशिक्षणार्थिना केवळ सलग तीन वर्षे संस्थेत अभ्यास करणेकरीता हा प्रवेश असेल.

९. कोणत्याही कारणास्तव प्रवेश नाकारण्याचे व वेळापत्रकात बदल करण्याचे अधिकार संस्थेस राहतील.

१०. परीक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षेसंबंधी सर्व माहिती व सूचना संस्थेच्या नोटीस बोर्डावर तसेच ठाणे महानगरपालिकेच्या www.thanecity.gov.in व संस्थेच्या www.cdinstitute.net किंवा www.cdinstitute.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

११. अधिक माहितीसाठी चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र भुषण ति. डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी ग्रंथालय इमारत, वेदांत कॉम्प्लेक्स समोर, कोरस रोड, वर्तकनगर, ठाणे (प.) येथे सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० या कार्यालीयन वेळेत समक्ष येऊन संपर्क साधवा.

( महादेव जगताप )
संचालक,
चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्था,
ठाणे महानगरपालिका , ठाणे.